# भूगोल विभागात एकदिवशीय टोटल स्टेशन आधारित कार्यशाळा संपन्न

एस.एन.जे.बी. संचलित के,के.एच.ए.कला, एस.एम.जी.एल.वाणिज्य, व एस.पी.एच.जे विज्ञान महाविद्यालयातील भूगोल विभागातर्फे एक दिवसीय टोटल स्टेशन प्रात्यक्षिक कार्यशाळेचे दिनांक ०४/०४/२०२४ रोजी आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेसाठी एस.एच.एच.जे.बी. पोलीटेक्निक महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. ऋषिकेश आहिरराव सर यांना  निमंत्रित करण्यात आले होते. टोटल स्टेशन संबंधित प्रात्यक्षिक करतांना श्री. ऋषिकेश आहिरराव सर यांनी टोटल स्टेशन सर्वेक्षणाचे फायदे, तोटे, टोटल स्टेशन ची महत्वाची कार्ये, टोटल स्टेशन साठी लागणारे आवश्यक साहित्य यासंबंधी सविस्तर माहीती दिली. तसेच विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक स्वरुपात महाविद्यालयातील मैदानाची मोजणी हे देखील प्रात्यक्षिक करून दाखविले. सदर कार्यशाळेचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एन.शिंपी यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एन.शिंपी यांनी देखील टोटल स्टेशन या सर्वेक्षणाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. तसेच भूगोल विभाग प्रमुख डॉ.सि.के.कुदनर यांनी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते यांचा परिचय करून दिला व सर्वेक्षनामधील विविध प्रकारच्या संधी तसेच सर्वेक्षणाचे दैनंदिन जीवनामध्ये महत्व यावर मार्गदशन केले. सदर कार्यशाळेसाठी भूगोल विभागातील प्रा.प्रविण सोनवणे, प्रा. रामदास शिंदे, प्रा. अमोल बरकले, प्रयोगशाळा परिचर कुणाल साळवे हे देखील उपस्थित होते.



एस.एच.एच.जे.बी. पोलीटेक्निक महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. ऋषिकेश आहिरराव विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना समवेत इतर प्राध्यापक